शनिवार दि.६ एप्रिल २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : २२५
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत     संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com     Lokneta News - लोकनेता न्युज     8459977904     www. lokneta.com

## नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामात खोडा

# चक्क बोगस ना हरकत प्रमाणपत्र काम रद्द करण्याचे पत्र देऊन बांधकाम थांबवले





लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

सिंदखेडराजा येथे नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरू आहे मात्र हे काम सुरू असताना एक धक्कादायक प्रकार येथे बघायला मिळाला या इमारतीच्या बांधकामासाठी महावितरण कंपनीने आरक्षण उठवण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे मात्र हे काम थांबण्यासाठी काही विघ्नसंतुष्ट लोकांनी चक्क अधीक्षक अभियंता यांच्या नावाने सदर ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येत असल्याचे बनावट प्रमाणपत्र नप मुख्याधिकाऱ्यांना देऊन काम बंद पाडण्याचा प्रकार केला दरम्यान अचानक आलेल्या पत्राची चौकशी केली असता सदर प्रमाणपत्र आपण दिले नसून ते बनावट आहे असे पत्रच महावितरणच्या अधीक्षक अभियंता यांनी दिल्याने काम सुरू होण्याचा मार्ग सुकर झाला दरम्यान या बनावट पत्राची दखल घेत महसूल विभागाने संबंधित बनावट पत्र देणाऱ्या वर तात्काळ गुन्हे दाखल करा असे आदेश दिले तर हे प्रकरण पोलीस स्टेशनमध्ये जाऊन या प्रकरणाची सखोल चौकशी करून बनावट प्रमाणपत्र देणाऱ्या चा शोध घ्यावा आणि त्याच्यावर गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे त्यामुळे हा बनावट प्रमाणपत्र देणारा कोण आणि त्याचा उद्देश काय हे  लवकरच जनतेसमोर येणार आहे.

याबाबत माहिती अशी की सिंदखेडराजा येथील तहसील कार्यालय हे पुरातत्व विभागाच्या जागेत आहे सदर कार्यालयची इमारत शिकस्त होत असून ती पडल्यानंतर त्या  ठिकाणी पुन्हा कार्यालय बांधणे होणार नाही यासाठी प्रशासनाच्या वतीने नवीन प्रशासकीय इमारत बांधण्यासाठी जागा बघणे सुरू केले होते त्यानुसार प्रशासनाने दोन जागा दाखवल्या होत्या त्यापैकी वीज वितरण कंपनीला लागून असलेली ई क्लास ची जमीन प्रशासकी इमारत साठी मंजूर केली त्याचे नुकतेच भूमिपूजन करून  बांधकाम करण्यास सुरुवात  करण्यात आली  काम प्रगतीपथावर असतानाच या ठिकाणी हे प्रशासकीय इमारतीचे काम बंद पाडण्याचे षडयंत्र काही विघ्न संतुष्टी लोकांकडून रचल्या गेले  वीज वितरण कंपनीकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले होते त्यामुळे काम सुरळीत सुरू असतानाच हे काम बंद पाडण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांला  वीज वितरण कंपनीचे नावाने सदर ना हरकत प्रमाणपत्र रद्द करण्यात येत असल्याचे चक्क बनावट पत्र अधीक्षक अभियंता यांच्या नावाने देण्यात आले त्यामुळे एकच खळबळ उडाली आणि सुरू असलेले बांधकाम बंद झाले त्यामुळे करोडो रुपयांची नुकसान होणार होते  दरम्यान या संदर्भात गावातील काही लोकांनी हे पत्र कसे काय दिले याची चौकशी केली असता वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता कटके यांनी सदर पत्र आपण दिलेच नसल्यास पत्र देऊन सदर पत्र बनावट असल्याचे सांगितले दरम्यान या पत्राची दखल घेत महसूल विभागाने बनावट पत्र देणाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्याचे आदेश मुख्याधिकाऱ्यांना दिले आहेत याप्रकरणी चौकशी साठी सदर प्रकरण सिंदखेडराजा पोलिसात  गेले आहे.

### चौकशी करून तात्काळ गुन्हे दाखल करा

दरम्यान हे बनावट पत्र कोणी दिले या संदर्भात तात्काळ चौकशी करून दोषीवर कठोरात कठोर कारवाई करावी आणि काम सुरू करावे अशी मागणी  राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष एडवोकेट नाझेर काजी माजी नगराध्यक्ष देविदास भाऊ ठाकरे माजी उपनगराध्यक्ष विजुभाऊ तायडे यांनी केली आहे.

# चार ब्रास अवैध रेती वाहतूक करणारे टिप्पर दंडात्मक कारवाई साठी पोलीस ठाण्यात जमा

## दोन्ही महिला अधिकाऱ्यांचा कारवाईचा धडाका सुरूच

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**




महसुलच्या दोन्ही महीला आधिकर्यांच्या धडाकेबाज कारवाई सुरूच असल्याने रेती माफियाचे धाबे दणाणले आहेत शुक्र वारी रात्री अवैधरित्या विनापरवाना रेतीचे चार बास वाहतूक करणारे टिप्पर पकडून कारवाईसाठी पोलीस स्टेशनला जमा करण्यात आले आहे सदर कारवाई उपविभागीय अधिकारी प्रा संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली देऊळगाव राजा चे तहसीलदार वैशाली डोंगरजाळ महसूल ना तहसीलदार डॉ  आस्मा मुजावर यांनी ही कारवाई केली आहे

याबाबत माहिती अशी की अवैध रेतीची चोरीछुपे वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळतात तहसीलदार वैशाली डोंगरगाव यांच्या मार्गदर्शनाखाली  महसूल ना तहसीलदार डॉ अस्मा मुजावर यांनी सापळा रचून  एम एच ४२ टी १५ ७८ या क्रमांकाचे टिप्पर अवैध रित्या रेती वाहतूक करताना  बोराखेडी जवळ रंगेहात पकडले या टिप्पर चा मालक देऊळगावराजा येथील दीपक परमेश्वर जाधव असल्याचे  चालक लक्ष्मण गायकवाड यांनी सांगितले सदर टिप्पर पकडून  दंडात्मक कारवाईसाठी देऊळगाव राजा पोलीस स्टेशन ला जमा करण्यात आले आहे यावेळी सदर कारवाई मध्ये चालक चव्हाण शेरे आदी महसूलचे कर्मचारी सहभागी होते.

# बोरिबेल येथे अवैध दारू भट्टीवर दौंड पोलिसांचा छापा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**



दि ०५/०४/२०२४  रोजी सकाळी संतोष डोके पोलीस निरीक्षक दौंड पोलीस स्टेशन यांना गोपनीय बातमीदार मार्फत माहिती मिळाली की मौजे बोरिबेल गावचे हद्दीत कॅनॉल चे कडेला ओढ्यात  मनोज हिरामण चव्हाण हा अवैध दारू भट्टी काढत आहे, अशी खात्रीशीर माहिती मिळालेने त्यांनी तात्काळ पोलीस उप निरीक्षक शहाजी गोसावी यांना दोन पंच बोलविण्यास सांगून पोलीस स्टाफ व दोन पंच यांना सोबत घेऊन माहिती मिळाले ठिकाणी जाऊन सकाळी ०८.३० वा चे सुमारास छापा टाकला असता सदर ठिकाणी प्रत्येकी २०० लिटर चे ३ कच्चे रसायन चे ब्यालर त्यात एकूण ६०० लिटर कच्चे रसायन त्याची किंमत अंदाजे २१,०००/- तसेच तयार हातभट्टी दारू १५ लिटर त्याची किंमत १५०० रु,दारू गाळण्यासाठीचा एक लोखंडी ब्यारेल किंमत १००० रु, दारू काढण्यासाठी लागणार चाटु किंमत ५० रु, असा एकूण २३,५५० रु चा मुद्देमाल मिळून आला असून, सदर ठिकाणी मिळून आलेले कच्चे रसायन दोन पंचासमक्ष जागीच नष्ट करण्यात आले तसेच तयार हातभट्टी १५ लिटर दारू जप्त करण्यात आली असून सदर दारू भट्टी काढणारा इसम मनोज हिरामण चव्हाण रा- बोरिबेल ता.दौंड, जी.पुणे याचे विरोधात भा द वी स कलम ३२८ सह दारू बंदी अधिनियम कलम ६५(ख)(ग) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून सदर आरोपीस गुन्ह्याचे तपास कामी अटक करण्यात आली आहे. सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक पंकज देशमुख,अपर पोलीस अधीक्षक संजय जाधव,उ.वि.पो.अ स्वप्नील जाधव यांचे मार्गदर्शनाखाली दौंड चे पोलीस निरीक्षक संतोष डोके, पोलीस उप निरीक्षक शहाजी गोसावी,सहायक फौजदार संतोष शिंदे,पो.हवा लोहार यांनी केली असून सदर गुन्ह्याचा पुढील तपास पो.हवा महेंद्र लोहार करीत आहेत.

## शनिवार ते सोमवार राज्यात पावसाचा इशारा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

गेल्या काही दिवसांपासून राज्यात उकाडा चांगलाच वाढला होता. अनेक जिल्ह्यातील तापमानाचा पारा चाळीशीच्या पुढे गेला आहे. मात्र राज्यातील अनेक भागात उद्यापासून पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. यात शनिवार ते सोमवार पावसाचे प्रमाण जास्त राहील. सोमवारी विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांना येलो अलर्टही देण्यात आला. त्यामुळे उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे, हवामान विभागाने आज म्हणजेच शुक्रवारी नंदूरबार आणि धुळे जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज दिला आहे. तर शनिवारी मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, लातूर आणि नांदेड तर खानदेशातली जळगाव, नंदूरबार आणि धुळे तसेच मध्य महाराष्ट्रातील नाशिक, सोलापूर आणि सांगली या जिल्ह्यांमध्ये हलक्या पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

## चारोळी

**गेल्या क्षणाचे दु:ख**
**उगाच का करीत बसावे**
**अवघड वाटेवरही**
**चेहऱ्यावरती हास्य दिसावे.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

# लोकसभा निवडणुकीसाठी एसटी बसेस मिनी बसेस व ५२४ जीप गाड्यांची व्यवस्था

लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**




आगामी २६ एप्रिल २०२४ रोजी दुसऱ्या टप्प्यात लोकसभा निवडणूक होऊ लागली असून निवडणूक विभागाने राज्य परिवहन मंडळाच्या २७० बसेस, ५४ मिनी बस आणि ५२४ जीप गाड्या अशा एकूण ८ ४८ वाहने बुक करणार असल्याची माहिती आहे

लोकसभा निवडणुकीसाठी जिल्हाधिकारी व जिल्हा प्रशासन जोमाने कामाला लागले असून जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे बसेस पुरविण्याचे पत्र होतात बुलढाणा आगारा कडून ४२, तर चिखली आगारातून ३९, सिंदखेडराजा येथून ४३, मेहकर आगारातून ४३, खामगाव आगारातून ३१, जळगाव जामोद आगारातून ४० व मलकापूर आगारातून ३२ अशा २७० बसेसची व्यवस्था बुलढाणा आगाराचे विभाग नियंत्रक अशोक वाडीभस्मे यांनी केली आहे

दिनांक २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान असल्याने दिनांक २५ एप्रिल रोजी मतदान केंद्रा वर ईव्हीएम मशीन पोहोचविणे कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रात पोहोचण्याची बसेसचे चालक पार पडणार आहे तर मतदान आटोपल्यानंतर मतदान यंत्रे व कर्मचाऱ्यांना परत आणणार आहे

**बंदोबस्त सांभाळणाऱ्या पोलिसांना स्वतंत्र वाहने**

जिल्हाभरात मतदान पार पाडण्यासाठी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे तसेच पोलीस कर्मचारी व अधिकारी यांना पोहोचवून व अन्य जास्तीच्या बसेसची आवश्यकता असल्याने पोलीस प्रशासन त्यांच्या वाहनासह जास्तीच्या व बसेसची मागणी करणार आहे

**दिनांक २५ एप्रिल रोजी ईव्हीएम यंत्रासह कर्मचारी रवाना होणार**

बुलढाणा लोकसभा मतदारसंघात मुलांना चिखली सिनखेडराजा मेकर खामगाव व जळगाव जामोद या सहा विधानसभा मतदार संघाचां समावेश असून दिनांक २५ एप्रिल रोजीच ईव्हीएम मशीन व कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रावर पोहोचविल्या जाणार आहे त्यामुळे २७० एसटी बसेस ५४ मिनीबस व ८० जीप गाड्या या कामाकरिता दोन दिवस वापरल्या जाणार आहेत तर ४०४ वाहने कर्मचाऱ्यांची वाहतूक करणार आहे.

**घरपोच मतदानासाठी ही वाहने**

आचारसंहिता पथके, क्षेत्रीय अधिकाऱ्यांची पथके, सूक्ष्म निरीक्षक पथके, व अन्य पथकांच्या सेवेत जीप कार याचा वापर करण्यात येणार आहे तसेच ८५ वर्षे वयाच्या वर मतदार असल्यास घरबसल्या मतदान करण्याच्या सुविधेसाठी कर्मचाऱ्यांना वाहने देणार आहेत

# महात्मा ज्योतिबा फुले जयंती निमित्त ह.भ.प.शिवलीला ताई पाटील यांचे कीर्तनाचे आयोजन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**अनिलकुमार गोठी । मलकापूर**



बहुजन उद्धारक सेवा समितीच्या माध्यमातून दरवर्षी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाच्या आयोजन करण्यात येते यावर्षी येत्या ११ एप्रिल २०२४ रोजी महात्मा ज्योतिराव फुले जयंतीनिमित्त येथील शहीद संजय सिंह राजपूत स्मारक परिसरात ह भ प शिवलीलाताई पाटील यांच्या समाज प्रबोधनपर कीर्तनाच्या कार्यक्रमाचे आयोजन सायंकाळी सात वाजता करण्यात आले आहे त्या अनुषंगाने नियोजन बैठक पार पडली

विविध कार्यक्रमाबाबत नियोजन करण्यात येऊन आयोजित समाज प्रबोधनपर कीर्तनाच्या कार्यक्रमाच्या नियोजनावर चर्चा करण्यात आली आयोजित या कीर्तनाच्या कार्यक्रमाला महिला व पुढच्या करिता स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात येणार असून या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन च्या वतीने करण्यात आले आहे तर दरवर्षी प्रमाणे बहुजन उद्योग सेवा समितीद्वारे सामाजिक कार्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सामाजिक कार्य पुरस्कार प्रदान करण्यात येते यावर्षी रामकृष्णजी चोपडे यांनी समाजभूषण पुरस्कार जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडाकणे यांना विशेष कर्तव्य पुरस्कार तसेच एडवोकेट मीरा क्षीरसागर व एडवोकेट प्रदिप क्षीरसागर यांना सत्यशोधक फुले दांपत्य सामाजिक कार्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे यावेळी संतोष बोंबटकर, अशोक वानखेडे, किशोर राऊत, डॉ नितीन भुजबळ, प्रल्हाद उमाळे, मंगेश सातव, सुपेश बोंबटकर, दीपक बावस्कर, सोनवणे सर यासह बहुजन उधारक सेवा समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

संपादकीय

# आनंदाचे रंग अन् तरंग

लोकनेता न्यूज नेटवर्क

माणसाच्या जीवनाला सर्वांगीण समृद्धता देणाऱ्या घटकांतून त्याच्या आनंदाचे मोजमाप केले जाते. ज्या देशातील अधिकाधिक जनता आनंदी तो आनंद निर्देशांकात आघाडीवर राहतो. जनतेच्या आनंदासाठी त्या देशातील राज्यकर्ते, सामाजिक धोरणकर्त्यांनी त्या अनुषंगाने प्रयत्न केले पाहिजेत, प्रसंगी चुका दुरुस्त कराव्यात.जागतिक आनंद निर्देशांकाचा अहवाल दरवर्षी २० मार्च रोजी, जागतिक आनंद दिनी प्रकाशित केला जातो. संयुक्त राष्ट्रांनी २०२४चा जागतिक आनंद निर्देशांक अहवाल (वर्ल्ड हॅपीनेस इंडेक्स) नुकताच प्रकाशित केला. हा अहवाल जगभरातील देशातील नागरिकांच्या आनंदाचे मोजमाप करतो.१४६ देशांच्या या यादीत फिनलंड अव्वल असून, भारताचे स्थान १२६वे आहे. असे का होते, याचा मागोवा घेऊया. आनंद निर्देशांक हे सर्वसमावेशक सर्वेक्षण साधन आहे; जे आनंद, समाधान, कल्याण, आनंदाची भावना आणि आनंदाची इतर क्षेत्रे मोजते.मनोवैज्ञानिक कल्याण, आरोग्य, वेळेचे संतुलन, समुदाय, सामाजिक समर्थन, शिक्षण, कला व संस्कृती, पर्यावरण, सरकार, भौतिक कल्याण आणि काम त्याचबरोबर टिकाऊपणा आणि लवचिकतेच्या पैलूंचे मूल्यांकन करते.आनंद निर्देशांकाची व्याख्या भूतानच्या सकल राष्ट्रीय आनंद निर्देशांकातून आली. १९७२ मध्ये, भूतानने संपत्ती, आराम आणि आर्थिक वाढ यांसारख्या इतर घटकांपेक्षा आनंदाला प्राधान्य देणे सुरू केले.त्यांनी मोजता येण्याजोग्या घटकांवर आधारित आनंदासाठी एक अनुक्रमणिका तयार केली. तेव्हापासून या निर्देशांकाचा मागोवा घेतला गेला. भूतानमध्ये, आनंद निर्देशांक ग्रॉस नॅशनल हॅपिनेस (जीएनएच) आणि ग्रॉस नॅशनल हॅपिनेस इंडेक्स (जीएनएचआय) यावरून मोजला जातो.जुलै २०११ मध्ये, संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेने आनंद विकासाच्या सर्वांगीण व्याख्येबाबत ठराव केला. आपल्या सदस्य देशांना त्यांच्या लोकांच्या आनंदाचे मोजमाप करण्यासाठी आणि सार्वजनिक धोरणांचे मार्गदर्शन करण्यात मदतीसाठी माहिती मागविली होती.पहिला जागतिक आनंद अहवाल १एप्रिल २०१२रोजी प्रसिद्ध केला, ज्यामध्ये जागतिक आनंदाची स्थिती, आनंद व दुःखाची कारणे आणि धोरणात्मक परिणामांची रूपरेषा दिली. याआधी भूतानने त्यांचे मुख्य विकास निर्देशांक म्हणून 'सकल देशांतर्गत उत्पन्ना'ऐवजी 'सकल राष्ट्रीय आनंद' स्वीकारला होता.आनंद निर्देशांक प्रत्येक देशासाठी महत्त्वाचा आहे, कारण तो व्यक्तीचा आनंद, सामुदायिक कल्याण, सामाजिक न्याय, आर्थिक समानता आणि पर्यावरणीय टिकाऊपणाचे मूल्यांकन करतो. दुसरे म्हणजे आनंद निर्देशांक सामाजिक बदलांना चालना देण्यासाठी सहाय्यभूत ठरतो. धोरणकर्त्यांना नागरिकांच्या कल्याण व समाधानासाठी योजना बनवण्यासाठी आवश्यक आकडेवारी प्रदान करतो.संयुक्त राष्ट्रे 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट सोल्युशन्स नेटवर्क' हा अहवाल प्रकाशित करतात. अहवालात देशांतर्गत उत्पादन, आयुर्मान, उदारता, सामाजिक समर्थन, स्वातंत्र्य आणि भ्रष्टाचार या सहा घटकांवर आधारित आनंदाचे मोजमाप केले जाते.

१. स्थूल राष्ट्रीय उत्पादन : देशाच्या आर्थिक समृद्धीच्या मूल्यांकनासाठी देशांतर्गत उत्पन्नाची (जीडीपी) आकडेवारी उपयुक्त आहे. दरडोई उत्पन्नाच्या पातळीचा लोकांच्या जीवनावर आणि परिणामी जागतिक आरोग्य निर्देशांकावर थेट परिणाम होतो. दरडोई 'जीडीपी' जितका जास्त तितकी देशाची अर्थव्यवस्था निरोगी.

२. आयुर्मान : आयुर्मानाचा उपयोग जीवनाची गुणवत्ता आणि आरोग्यसेवेच्या सुलभतेच्या मूल्यांकनासाठी केला जातो. उच्च आयुर्मान म्हणजे निरोगी लोकसंख्या, सुलभ आरोग्यसेवा आणि सर्वसाधारणपणे उच्च दर्जाचे जीवन. दीर्घ आयुर्मानाच्या देशांना जागतिक आरोग्य निर्देशांकामध्ये उच्च दर्जा दिला जातो.

३. सामाजिक सहकार्य : सामाजिक संबंधासाठी नातेवाईक, मित्र असणे आवश्यक आहे. एखादी समस्या उद्भवल्यास ते मदतीस येतात. एखाद्या व्यक्तीला संकटसमयी मदत करणारे कोणी नसेल तर तिची दयनीय अवस्था होते. सामाजिक सहकार्य चांगल्या प्रकारे मिळाल्यास व्यक्ती दुःख, उदासीनतेपासून दूर राहते.

४. औदार्य : म्हणजे दानधर्म करण्याची सवय. धर्मादाय संस्थांना मदतीची लोकांची तयारी असेल तर ती उदारता थेट समृद्धीशी संबंधित आहे. जितके जास्त दान दिले जाईल तितके ते लोक अधिक आनंदी राहतील.

५. स्वातंत्र्य : हे मूलभूत घटकांपैकी एक आहे. प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे जीवन निवडायचे असते, स्वतःचा अधिकार हवा असतो. स्वातंत्र्य म्हणजे संधी- प्रवासाची, मतदानाची आणि प्रात्यक्षिकांमध्ये सहभागाची, इ. संधी जितक्या अधिक तितके जीवनमान चांगले.

६. भ्रष्टाचार : व्यवहारातील भ्रष्टाचारामुळे गुंतवणुकीवर विपरित परिणाम होतो. कामगिरीचा दर्जा खालावतो. सरकारी खात्यामधील भ्रष्टाचारामुळे मानवी हक्कांचे उल्लंघन, सामाजिक अन्याय आणि खराब आर्थिक कामगिरी होऊ शकते. त्यामुळे सरकार आणि व्यावसायिक भ्रष्टाचार या दोन्हींचा थेट संबंध आर्थिक कामगिरी आणि वैयक्तिक आनंदाच्या खालावणाऱ्या पातळीशी आहे.भारतात सत्तेवर आलेल्या प्रत्येक सरकारकडून देशवासीयांच्या जीवनमानात, सकारात्मक बदल घडवून आणल्याचा दावा केला जातो. मग ते केंद्रातले सरकार असो किंवा राज्यातले सरकार असो. प्रत्येक सरकार जनतेसाठी काय-काय केले, या कामांची यादी जाहीर करते.प्रत्यक्षात झालेली कामे आणि जाहीर झालेली यादी यात तफावत असते. भारतीय आनंदी नसल्याचं चित्र जागतिक आकडेवारीतून समोर आले आहे. त्याचे कारण म्हणजे एकीकडे आपण विकास झाल्याचे सांगतो; परंतु तो कोणाचा झाला, हे जर पहिले तर भारतात मूठभरांकडे एकवटलेली संपत्ती आणि बहुसंख्य गरीब यांच्यातील दरी दिवसेंदिवस रुंदावत आहे. संपत्ती आणि आनंद यांचा परस्परसंबंध आहे.गरिबी, भ्रष्टाचार, पायाभूत सुविधांचा अभाव, दुय्यम दर्जाच्या आरोग्य व शैक्षणिक सुविधा, मानसिक स्वास्थ्यासाठी पोषक वातावरणाचा अभाव, बेरोजगारी, वाढती लोकसंख्या, जागतिक तापमानवाढ, प्रदूषण अशा घटकांचा व्यक्तीच्या स्वास्थ्यावर, आनंदावर परिणाम होतो. भारत जगातील सर्वाधिक प्रदूषित देशांपैकी एक आहे.त्यामुळे श्वसनाचे आजार, आरोग्यविषयक समस्या वाढतात. देशात आजही सर्व बाबतीत असमानता, भेदभाव आणि सामाजिक अन्याय, जाती आणि लिंगभाव भेद आहे. अर्थशास्त्रातील संकल्पनेनुसार हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, केवळ आर्थिक वाढ नागरिकांच्या आनंदाची आणि कल्याणाची हमी देऊ शकत नाही.मानवी विकास आणि जीवनातील समाधान यांचा एकमेकांशी संबंध असतो, हे लक्षात घ्यावे. आनंद निर्देशांकाचे मोजमाप करणारे बहुतेक घटक मानवी विकासाच्या बदलत्या परिस्थितीवर अवलंबून असतात. आर्थिक कल्याणामध्ये नेहमीच सामाजिक कल्याण समाविष्ट नसते.म्हणून, सामाजिक आणि आर्थिक प्रगतीच्या विश्लेषणात मानवी विकास निर्देशांक आणि आनंद निर्देशांक या दोन्हींना महत्त्व आहे. भारताचे आनंद निर्देशांकात खालचे स्थान सर्वच भारतीयांसाठी चिंतेचे कारण आहे. सरकारने केवळ योजनांची घोषणा न करता त्याचा लाभ तळागाळातील घटकांपर्यंत पोहोचवावा. त्याचा लाभ त्यांना मिळत नसेल तर काय उपाययोजना करता येतील, याचा विचार करावा.नागरिकांचा आनंद, कल्याण यांना प्रतिकूल ठरणाऱ्या घटकांबाबत वेळीच उपाययोजना केल्या पाहिजेत. भारतीयांचे भवितव्य उज्ज्वल घडवण्यासाठी सरकारी यंत्रणांबरोबरच समाजसेवी संस्था, उद्योग-व्यावसायिक घटक यांनी विकासासाठी एकत्रितपणे काम केले पाहिजे.

# कथक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

'कथन करे सो कथक कहावे' असे म्हटल्या जाते.श्रीकृष्णाची कथा सांगता सांगता कथक नृत्य जन्माला आले.पूर्वी देवदेवतांच्या कथा, त्यांचे रूप घेऊन करून दाखविणे आणि सर्व जनसामान्यांचे मन, मनोरंजनाच्या माध्यमातून भक्तीच्या मार्गावर नेण्याचे काम 'कथक' करीत होते.

कथक म्हणजे कथा सांगणारा.हा नृत्यप्रकार प्रामुख्याने कलात्मक असल्यामुळे यास 'कथक ' म्हणतात. मूळ उत्तरप्रदेशचे असणारे हे शास्त्रीय नृत्य मात्र उत्तर भारतावर वारंवार झालेल्या परकीय आक्रमणामुळे त्यांच्या मूळ शैलीत फरक पडला. उदा.मोगलांच्या आक्रमणानंतर त्यांच्या शृंगारिक आणि विलासी वृत्तीचा या नृत्यशैलीवर प्रभाव पडला.तसेच इंग्रज राजवटीमध्ये कथक नृत्यामधील मुळ लयकारीचे प्रमाण वाढले,त्याला जास्त महत्व दिले गेले.

उत्तर भारतातील कथक या शास्त्रीय नृत्याचे मुख्य तीन घराणे आहेत .

घराणे व घराण्याचे प्रवक्ते :

जयपूर घराणे :

भानुजी,नथुलाल, शंकरलाल, गिरिधारीलाल, व भानजी.

लखनऊ घराणे:

ईश्वरीप्रसाद.



बनारस: जानकीप्रसाद

कथक नृत्य वैयक्तिक तसेच समुहानेदेखील सादर केले जाते. कथक नृत्यशैलीमध्ये गणेशवंदना, आमद, थाट, नटवरी , परण, चक्रदार परन,तोडा, पढत,सलामी, कवित्त, परमेलू भजन ,ठुमरी, होरी,गतभाव ,धमार, हे नृत्यघटक असतात. यास हिंदुस्थानी संगीताची साथ असते.यात नृत्य प्रभावी असते.ताल आणि लय यांचा सुरेख समव्यय साधत नृत्यकार तोंडाने तबल्याचे बोल बोलून पदन्यासातून ते व्यक्त करतात . लयकारीवरील प्रभुत्व खुलविण्यासाठी नर्तक पायात खूप घुंगरू बांधतात.तत्कार(लयकारी) व भ्रमरी(गिरक्या)ही या नृत्याची खास वैशिष्ट्ये आहेत.या नृत्यशैलीमध्ये हस्तमुद्रांचा वापर कमी दिसतो.

**नृत्ययात्रा**

संगीत: हिंदुस्थानी संगीतावर आधारित या नृत्यशैलीला पखवाज, तबला, सारंगी,पोटी, बासरी, तंबोरा, सतार इ.वाद्यांची साथ असते. राधाकृष्ण हे या नृत्याचे दैवत आहेत.

वेशभूषा : एक हिंदुस्थानी व एक मोगल पद्धत.देवांची वंदना,पद,दशावतार,नायिका -वगैरेकरिता घागरा चोळी ओढणी व त्याला साजेसे मोत्यांचे अलंकार इ. हिंदुस्थानी वेशभूषा तर तराना,गजल किंवा नृत्यासाठी मोगलपद्धतीची वेशभूषा केली जाते .यामध्ये सलवार,अंगरखा, जाकीट व कोणी डोक्यावर वेगळ्या पद्धतीची टोपीही घालतात व त्याला साजेसे अलंकार घातले जातात.

प्रसिद्ध नृत्यकार: बिंदादीन महाराज, अच्छन महाराज, पं.बिरजू महाराज, नारायणप्रसाद, दुर्गाप्रसाद,ह्या महान व्यक्तीमत्वांबरोबरच महाराष्ट्रातील स्व .रोहिणी भाटे , शमा भाटे, मंजिरी देव , मनीषा साठे,पार्वती दत्ता, अभिनेत्री शर्वरी जमेनिस,अदिती भागवत या ह्या आघाडीच्या कथक नृत्यांगना आहेत.अशाप्रकारे आज आपण उत्तर भारतातील कथक या शास्त्रीय नृत्याबद्दल जाणून घेतलत.भेटूया पुढील एका शास्त्रीय नृत्यशैली सोबत.

डॉ.रेणू जोशी.
(अभिनेत्री, नृत्यदिग्दर्शिका )

# 'टिकटॉक'वर बंदी,भारतासाठी संधी

लोकनेता न्यूज नेटवर्क


सोशल मीडियाच्या प्रभावाखालील गेल्या दशकात आपली संधी हुकली; पण आज अमेरिकेतील 'टिकटॉक'वरील बंदी हा विषय भारतासाठी संधी नवी घेऊन येत आहे. भारताचे सामरिक स्थैर्य आणि जगाचा वाढता विश्वास या जोरावर, या क्षेत्रात मोठी भरारी घेणे शक्य आहे. राजकीय इच्छाशक्ती आणि आयटी कंपन्यांची साथ मात्र गरजेची आहे. माणूस हा सामाजिक प्राणी आहे. त्यामुळे इतरांशी जोडलेले असणे त्याला आवश्यक वाटते. त्यांच्याशी संवाद साधता यावा, आपले विचार मोकळेपणाने मांडता यावेत, असे त्याला तीव्रतेने वाटते. हे पिढ्यानुपिढ्या चालत आले आहे. पण आधुनिक तंत्रज्ञानाने परस्परसंवादाची सगळी परिमाणेच बदलून टाकली आहेत.

इंटरनेटवर कळपाने म्हणजेच 'सोशल' राहण्याची खरी चाहूल २००४ मध्ये ''ऑर्कुट'' मुळे झाली. शाळा-कॉलेजांमधील जुने मित्र या प्लॅटफॉर्ममुळे एकत्र आले. त्यानंतर फेसबुक किंवा मेटा, युट्यूब, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअप यांसारखे अधिक मोठे व वैविध्यपूर्ण माहिती शेअर करू शकणारे प्लॅटफॉर्म आले.मोबाईल फोनच्या क्रांतीमुळे एका क्लिकवर हे 'सोशल मीडिया' प जगातील जवळजवळ प्रत्येकाला विनामूल्य उपलब्ध आहेत. प्रत्येक जण त्यामार्फत जगाशी जोडलेला आहे. विचारांचे मुक्त आदानप्रदान सुरू आहे.

हे प वापरताना आपण त्यांना आपली बरीच माहिती देतो. दूरध्वनी क्रमांक, वास्तव्याचा पत्ता, वय, लिंग, इत्यादी. त्याचबरोबर, ''युजर लायसन्स ग्रीमेंट'' ला सुद्धा बहुतेक वेळेला न वाचताच मान्यता देतो. प्रत्येक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचे स्वतःचे अल्गोरिदम असतात, त्यानुसार पुढे हे प आपण कोणते व्हिडिओ पाहतो, लाईक करतो, कोणाला काय माहिती शेअर करतो, याच्या निरीक्षणातून माहिती, जाहिराती वगैरे पाठवल्या जातात.आपल्या प्रतिसादानुसार अल्गोरिदम बदल करत राहतात व प्रगल्भ बनत जातात. प्रत्येक वापरकर्त्याचे व्यक्तिमत्व, आवडनिवड, विचार, राजकीय कल, धार्मिक आचार, शिक्षण, अगदी रोजच्या झोपायच्या, उठायच्या वेळा, अशा एक ना अनेक गोष्टी या कंपन्यांकडे असतात.

जोपर्यंत हे सर्व केवळ योग्य माहिती देण्यासाठी, जाहिराती पाठवण्यासाठी, सेवेचा दर्जा वाढवण्यासाठी होते, तोपर्यंत आक्षेप नसतो. परंतु, जेव्हा या इंटरनेटवरील कळपाला देशाबाहेरील शक्ती काही अंतस्थ हेतूने नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा फक्त सरकारांनीच नाही, तर प्रत्येक नागरिकानेदेखील जागे होणे गरजेचे बनते.

अमेरिकेतील प्रतिनिधिगृहात नुकताच ''टिकटॉक'' या ''बाईटडान्स'' नावाच्या चिनी कंपनीच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या संदर्भात एक ठराव मोठ्या बहुमताने संमत करण्यात आला. त्यानुसार,



येत्या सहा महिन्यांत 'टिकटॉक' प्लॅटफॉर्म कोणत्यातरी अमेरिकी कंपनीलाच विकला पाहिजे, जेणेकरून अमेरिकेतील नागरिकांच्या हिताचे नियम पाळणे 'टिकटॉक'' ला बंधनकारक राहील. अन्यथा त्याला अमेरिकेत संपूर्ण बंदी घालण्यात येईल.

या निर्णयाला आणखी बरेच घटनात्मक अडथळे पार करायचे आहेत. तसेही, अमेरिकी सरकारचा हा नियम 'बाईटडान्स' मान्य करेल, याची सुतराम शक्यता नाही, कारण त्यांना अल्गोरिदमसुद्धा द्यावे लागेल. जे त्यांना खूप अडचणीचे होणार आहे.

अमेरिकेत आणि युरोपातील कित्येक देशांच्या सरकारी आस्थापनांतील कॉम्प्युटर व मोबाईल फोनमध्ये 'टिकटॉक'वर आधीच बंदी घातलेली आहे. चीन सरकारने २०१७ मध्ये बनवलेल्या ''नॅशनल इंटेलिजन्स लॉ'' नुसार, कोणत्याही चिनी कंपनीने जगात कोठेही, कसलाही व्यवहार केल्यास संबंधित व्यक्तींची सर्व माहिती सरकारला देणे सक्तीचे आहे.

''बाईटडान्स''ला तशी ती द्यावी लागणार होती. चीन सरकार महत्त्वाच्या लोकांवर तसेच अमेरिकी नागरिकांवर पाळत ठेवते, टिकटॉकच्या ''फॉर यू'' या फीचरच्या माध्यमातून त्यांचे मतपरिवर्तन करते आदी आरोप त्यातूनच होऊ लागले.

पॅलेस्टाईन-इस्राईल संघर्षात पॅलेस्टाईनच्या पाठिंब्याने सहानुभूती निर्माण होणाऱ्या व्हिडिओंचा प्रसार अधिक करणे, २०१९मध्ये अमेरिकेतील लहान मुलांची वैयक्तिक माहिती पालकांच्या सहमतीविना गोळा करणे, हे प्रकरण बंद करण्यासाठी चारहजार कोटी रुपयांचा दंड भरावा लागणे, बांगला देश, इंडोनेशिया, आदी देशांत ईशनिंदा होईल, असे व्हिडिओ प्रसारित करणे, त्याचप्रमाणे अश्लील व्हिडिओ पसरवण्यात प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देणे इत्यादी आरोप कंपनीवर झाले.अमेरिकी सिनेटसदस्य असलेल्या टॉम कॉटन यांनी जे निवेदन केले ते धक्कादायक म्हणावे लागेल. काही मुलांनी 'टिकटॉक'वर प्रेरक व्हिडिओ 'सर्च' कले, तर त्यांना आत्महत्येस प्रवृत्त करणारे व्हिडिओ सुचवण्यात आले होते.दुर्दैव म्हणजे त्याला ती मुले बळी पडली. 'बाईटडान्स'मधील कर्मचाऱ्यांवर दोन वर्षांपूर्वीच जे आरोप सिद्ध झाले, त्यात अमेरिकी प्रशासनातील अधिकाऱ्यांची गोपनीय कागदपत्रे मिळवणे, टिकटॉक वापरणाऱ्या पत्रकारांवर नजर ठेवणे, त्यांच्या कॉम्प्युटरचे आयपी ड्रेस, त्यांच्या घराचे स्थान मिळवणे,अशा आरोपांचा समावेश होता.अमेरिकी सिनेटसदस्य 'टेड क्रूझ' यांनी निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे, एकाच प्रकारच्या 'सर्च की-वर्ड' साठी चीनमध्ये शिक्षण, तंत्रज्ञान आदींचे व्हिडिओ दाखवले जातात, तर इतर देशांत धार्मिक, तसेच भावनांशी निगडित व्हिडिओ दाखवले जातात. चीनला अडचणीचे ठरणारे हाँगकाँग, तिआन मेन चौक, तिबेट आदींच्या संदर्भातील व्हिडिओ 'टिकटॉक'वर जवळजवळ नाहीतच.अमेरिकेची लोकसंख्या साधारणपणे ३३ कोटी आहे. त्यातील १७ कोटी लोक आज 'टिकटॉक' वापरतात. त्यांपैकी जवळपास सहा कोटी वापरकर्ते १८ ते २४ वयोगटातील आहेत, तर महिला व पुरुषांचे 'टिकटॉक' वापराचे प्रमाण समसमान आहे.'टिकटॉक' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अगदी तीन सेकंदांपासून ते तीन मिनिटांपर्यंतचे व्हिडिओ शूट करून अपलोड करता येतात. हे व्हिडिओ बनवताना त्यासाठी कित्येक प्रकारचे फीचर, जसे स्टिकर, विविध प्रकारचे आवाज, व्हिजुअल इफेक्ट, पार्श्वगाणी, ड्युएट, दोन स्क्रीन्स आदी उपलब्ध करून दिलेले आहेत.त्यामुळे २०१६ मधे बनलेल्या या 'प'ने लवकरच मोठे स्थान मिळवले. आज 'टिकटॉक'चे जगभरात २०५ कोटी लोकांपेक्षा अधिक वापरकर्ते आहेत आणि आजवर ४.५ अब्जपेक्षा जास्त वेळा व्हिडिओ डाउनलोड झाले आहेत.टिकटॉकचे जागतिक मूल्य चार हजार अब्ज रुपयांहून अधिक आहे. या प्रचंड लोकप्रिय पवर बंदी घालण्याच्या निर्णयाला अमेरिकेतच विरोध होत आहे. कित्येक लोकांचा रोजगार यावर अवलंबून आहे.आश्चर्य म्हणजे, बायडेन सरकारने जरी 'टिकटॉक'वर बंदी आणण्यास संमती दर्शवली असली तरी, २०२४च्या शेवटी येऊ घातलेल्या निवडणुकांत 'टिकटॉक'चा प्रचारासाठी वापर फेब्रुवारीपासूनच सुरु केला आहे. त्यामुळे लोकांचा एकूणच विरोध, राजकीय प्रचारासाठीचा उपयोग, आदी पाहता बंदीचा निर्णय इतक्यात होईल, असे दिसत नाही.पण यातून काही गोष्टी शिकणे गरजेचे आहे. ते म्हणजे, मुक्त विचारस्वातंत्र्याच्या नावाखाली आपण आपल्या वैयक्तिक माहितीचा दुरुपयोग होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सरकारांनी त्यावर अभ्यास करूनच अशा 'प'ना ना मुभा द्यावी.आज गुगल, मेटा इत्यादी कंपन्यांना चीनमध्ये प्रवेश नाही. पण 'चिनी प' मात्र अमेरिकेत सेवा देऊ शकतात. हा मोठा विरोधाभास आहे. मुक्त विचार आणि व्यापार या वरवर सुसंस्कृत व सुंदर दिसणाऱ्या संकल्पनेच्या आडून कोणी अंतस्थ हेतूने वेगळाच कार्यभाग साधते आहे का, याबाबत वेळोवेळी दक्ष रहावेच लागेल.भारत, पाकिस्तान व नेपाळ या देशांत २०२०पासून 'टिकटॉक'वर संपूर्ण बंदी आहे. अमेरिकेच्या तत्कालीन सरकारने भारत सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले होते. पण त्यानंतर भारतात असे किती प किंवा प्लॅटफॉर्म बनवण्यात आले, याकडे आपण लक्ष दिले पाहिजे आणि पावलेही उचलली पाहिजेत.सोशल मीडियाच्या प्रभावाखालील गेल्या दशकात आपली संधी हुकली; पण आज अमेरिकेतील 'टिकटॉक'वरील बंदी हा विषय भारतासाठी संधी घेऊन येत आहे. भारताचे सामरिक स्थैर्य आणि जगाचा वाढता विश्वास या जोरावर, या क्षेत्रात मोठी भरारी घेणे शक्य आहे. राजकीय इच्छाशक्ती आणि आयटी कंपन्यांची साथ मात्र गरजेची आहे. यात भारताचे सार्वभौमत्व जपणे आणि जगाला आश्वासक सोशल मीडिया प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देणे, हे दोन्ही साध्य होईल.

# 'रेडी रेकनर'चा दिलासा

लोकनेता न्यूज नेटवर्क

राज्य सरकारने यंदा 'रेडी रेकनर'चे दर कायम ठेवल्याने घरे खरेदी करू इच्छिणाऱ्यांना मुद्रांक शुल्काच्या खर्चात काहीसा दिलासा मिळाला आहे.गृहकर्जांच्या चढ्या दराचा घर खरेदीदारांना फटका बसत असताना राज्य सरकारने यंदा 'रेडी रेकनर'चे दर कायम ठेवल्याने घरे खरेदी करू इच्छिणाऱ्यांना मुद्रांक शुल्काच्या खर्चात काहीसा दिलासा मिळाला आहे. सलग दुसऱ्या वर्षी या दरात वाढ न करण्याच्या सरकारच्या निर्णयामागे अर्थातच लोकसभेची निवडणूक हेच मोठे कारण आहे. निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी राज्य सरकारने या दरांच्या संदर्भातील निर्णय घेतला नव्हता; त्यामुळे नोकरशाहीच्या अखत्यारित या दरांत काही प्रमाणात वाढ होण्याची शक्यता होती. मात्र, अधिकाऱ्यांनीही दरवाढ न करण्याची दिशा ओळखलेली दिसते.मुंबई, पुणे आदींसारख्या शहरांत घर खरेदी करू इच्छिणाऱ्यांना या निर्णयाचा दिलासा मिळेल. वस्तू व सेवा कर (जीएसटी) देशात लागू झाल्यानंतर राज्य सरकारच्या उत्पन्नाच्या स्रोतांवर मर्यादा आली आहे. त्यामध्ये मुद्रांक शुल्क हा जवळपास ५० हजार कोटी रुपये मिळवून देणारा महत्त्वाचा स्रोत असल्याने हे दर ठरविताना सरकारलाही एकीकडे उत्पन्नाचे गाडे रुळावर ठेवणे आणि दुसरीकडे सर्वाधिक रोजगार निर्माण करणाऱ्या बांधकाम क्षेत्राची गती कायम ठेवणे, असा व्यापक विचार करावा लागतो. गेल्या काही वर्षांत आर्थिक मंदी, नोटाबंदी, करोना आणि महागाईमुळे गृहकर्जांवरील व्याजदरात झालेली वाढ असे एकापाठोपाठ एक फटके या क्षेत्राला बसले. करोना काळानंतर, स्वत:च्या मालकीचे घर असावे, असे मानणाऱ्या नागरिकांची संख्या वाढत आहे. नव्या बांधकाम नियमावलीमुळे चटईक्षेत्र मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले. मात्र, मोठ्या शहरांमध्ये जागांची मर्यादित उपलब्धता आणि वाढते दर, महागाईने वाढलेला बांधकामांचा खर्च, व्याज दरवाढीने गृहकर्जांचे वाढते हप्ते, फर्निचरसारख्या अन्य खर्चातही वाढ या सर्वांचा भार अंतिमत: ग्राहकांवरच पडतो आणि घरांची खरेदी आवाक्याबाहेर जाते.या पार्श्वभूमीवर रेडी रेकनरचे दर कायम ठेवण्याच्या निर्णयाकडे पाहता येईल. यामुळे, घर खरेदीदारांना दिलासा मिळाला तरी विकासकामांसाठी भूसंपादनाचा मोबदला, महापालिकेचे उत्पन्न याच दरांवर ठरत असल्याने त्यावर परिणाम होऊ शकतो. गेल्या वर्षभरात विशिष्ट विभागांमध्ये झालेल्या खरेदी विक्री व्यवहारांची सरासरी काढून मुद्रांक शुल्क भरण्यासाठी 'रेडी रेकनर'चा दर निश्चित केला जातो. मात्र, हा दर निश्चित करण्याची पद्धती ढोबळ असून, त्यात आणखी सुधारणा अपेक्षित आहेत. सध्याच्या पद्धतीमुळे कमी किंमतीची घरे खरेदी करणाऱ्यांना फटका बसतो. त्यामुळे आणखी तपशीलवार अभ्यास करून छोटे विभाग करायला हवेत.

# जिल्ह्यातील अनाधिकृत शस्त्र जप्त करा- जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे आदेश

## आदेश पालन न करणाऱ्यांवर सक्त कारवाईचे निर्देश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर आदर्श आचारसंहिता लागू झाली असून चौथ्या टप्प्यात १३ मे रोजी ३९ बीड मतदार संघात मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदार संघात कुणाकडे अनाधिकृत शस्त्र असल्यास ते जप्त करण्याचे सक्त आदेश जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी आज झालेल्या कायदा व सुव्यवस्थेच्या बैठकीत पोलीस अधिकाऱ्यांना दिले.





जिल्हा नियोजन सभागृहात आज सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ ची कायदा व सुव्यवस्थेची आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी बोलत होत्या.यावेळी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर,अपर जिल्हाअधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी,अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर,अतिरिक्त पोलीस अधीक्षक अंबाजोगाई चेतना तिडके,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके,निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी,उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, सर्व जिल्ह्याचे सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकारी यांच्यासह अन्य पोलीस अधिकारी यावेळी उपस्थित होते. बीड जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये अनाधिकृत शस्त्र मोठ्या प्रमाणात आहेत. अनधिकृत शस्त्र जमा न करणाऱ्यांवर पोलिसांनी कायदेशीर कारवाई करून असे शस्त्र जप्त करावेत.अनाधिकृत शस्त्र जप्तीबाबतची आढावा बैठक पुढील आठवड्यात घेण्यात येणार असल्याचे जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सांगितले.यावेळी जिल्हा निर्णय निवडणूक अधिकारी यांनी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या सीमेवरचा नाकेबंदीचा पॉईंट दुसऱ्या जिल्ह्याच्या सीमेलगत असावा असे सुचविले.यामुळे दोन्ही जिल्ह्यातून अवैध होणारी वाहतूक अथवा अन्य कायदा सुव्यवस्था बिघडणाऱ्या गोष्टीवर नियंत्रण ठेवण्यात येईल. जर दोन जिल्ह्यातील अंतर अधिक असेल अशावेळी अधिकचा बंदोबस्त लावण्यात यावा असे यावेळी निर्देशित केले. जिल्ह्यात १४ ठिकाणी नाकेबंदी करण्यात आली असून या ठिकाणी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी पोलिसांना मूलभूत सुविधा प्रदान कराव्यात अशा सूचना यावेळी जिल्हा दंडाधिकारी यांनी केल्या.न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे जिल्ह्यातील कोणत्याही गावाला गावबंदी करता येणार नाही तसे कुठलेही बोर्ड लावता येणार नाही तसे बोर्ड असल्यास ते काढून घ्यावे,आणि न्यायालयाची अवहेलना केली असल्यास कायदेशीर कारवाई करावी असेही जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निर्देशित केले. एखाद्या घटनेची संभाव्य माहिती मिळत असल्यास ती होण्यापूर्वीच योग्य ती कारवाई पोलिसांकडून करण्यात यावी, अशी सूचनाही त्यांच्याकडून करण्यात आली. जे पोलीस अधिकारी तसेच कर्मचारी निवडणुकीच्या कामावर आहेत त्यांच्यासाठी पोस्टल मतदानाचा उपयोग करन्यात आलेला आहे. यासाठी सहाय्यक निर्णय निवडणूक अधिकाऱ्यांनी याबाबत भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सुविधा केंद्र तयार करून पोस्टल मतदानासाठी ग्राह्य असलेल्या मतदारांचे मतदान करून घ्यावे, अशा सूचना यावेळी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी यावेळी केल्या.

# मराठवाड्याच्या वेशीवर बजरंग सोनवणे यांचे ठिकठिकाणी स्वागत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

राज्यात सर्वत्र लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी चालू असतांना एकीकडे बीड लोकसभेचे महायुतीचे उमेदवार पंकजा मुंडे यांनी गेल्या १५ ते २० दिवसापासून प्रचारार्थ जवळपास संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढला तर, दुसरीकडे ऐन वेळी डॉ.ज्योतिताई मेटे यांचे तिकीट कापून बजरंग सोनवणे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्याच पार्श्वभूमीवर आज सकाळी बजरंग सोनवणे यांनी बीड मतदारसंघात एन्ट्री करताच त्यांचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. यावेळी प्रसार माध्यमाशी संवाद साधताना बजरंग सोनवणे म्हणाले की,मागील निवडणुकीत सर्व नेते माझ्याबरोबर होते म्हणून माझा पराभव झाला,पण आता जनता बरोबर असल्याने माझा विजय निश्चित असल्याचा दावा बीड लोकसभेचे राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे



उमेदवार बजरंग सोनवणे यांनी केला.

बीड लोकसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर बजरंग सोनवणे आज सकाळी प्रथमच जिल्ह्यात दाखल झाले. त्यांनी आष्टी तालुक्यातील कडा येथे पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, जिल्ह्यातील जनतेचा सन्मान आणि स्वाभिमान राखण्यासाठी मी निवडणूक लढत आहे. जनताच निवडणूक हाती घेऊन मला निवडून देणार, यात कसलीही शंका नाही. सर्वसामान्य जनता माझ्याबरोबर असल्याने आपला विजय निश्चित असल्याचा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी माजी आमदार साहेबराव दरेकर,काँग्रेसचे रविकाका ढोबळे,महेबूब शेख, राम खाडे,किशोर हंबर्डे,सुनिल नाथ,दिपक खिळे यांच्यासह पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे यांचे आष्टी तालुक्यात आगमन होताच त्यांचे ठिकठिकाणी स्वागत होत असताना महायुतीमधील अजित पवार गटाचे आमदार बाळासाहेब आजबे यांचे कार्यकर्ते उपस्थित असल्याची दबक्या आवाजात चर्चा होतांना दिसत होती.


# खळबळजनक ! कुजलेल्या अवस्थेत महिलेचा मृतदेह आढळला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । राजू म्हस्के

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस स्टेशन अंतर्गत दररोज काही ना काही घटना घडत असून काल अहमदनगर ते जामखेड राष्ट्रीय महामार्गावरील धानोरा परिसरातील पिंपरखेड रोड लगत अर्धवट बांधकाम झालेल्या घरात अंदाजे ३५ ते ४५ वर्षीय महिलेचा कुजलेल्या अवस्थेत मृतदेह गुरूवारी सकाळी अकराच्या दरम्यान आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. सदर महिला कोण, कुठली, तिचा घातपात झाला की नैसर्गिक मृत्यू झाला याचा शोध लावण्याचे आव्हान पोलिसांसमोर असणार आहे.

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील धानोरा परिसरातील पिंपरखेड रोडलगत असलेल्या एका नवीन घराचे बांधकाम सुरू



असलेल्या घरात कुजलेला मृतदेह असल्याची माहिती अंभोरा पोलिसांना मिळताच सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी धाव घेतली. कुजलेला मृतदेह हा महिलेचा असून साधारण ३५ ते ४५ वर्ष वय असल्याचा अंदाज आहे. साधारण आठ दिवसापुर्वीचा हा मृतदेह असावा.आठ दिवसांपूर्वी मृत्यू झाल्यामुळे मृतदेह कुजलेला असल्याने जाग्यावरच शवविच्छेदन करण्यात आले. अंभोरा ठाणे हद्दीतून कोणी महिला मिसींग असेल तर त्यांनी ताबडतोब माहिती द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे. महिलेची ओळख पटवण्यासाठी शोध पत्रिका पाठवण्यात आली असल्याचे अंभोरा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांनी सांगितले आहे. घटनास्थळी सहायक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे, पोलीस उपनिरीक्षक देवीदास सातव, पोलीस अंमलदार सुदाम पोकळे, सतीश पैठणे, यांनी भेट देऊन पंचनामा केला.

# भाजप आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

धाराशिव (वृत्तसंस्था)

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर विधानसभा मतदार संघाचे भाजप आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांनी आज अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे. पक्षप्रवेश होताच प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी अर्चना पाटील यांना धाराशिव लोकसभेची उमेदवारी देखील जाहीर केली. या पक्षप्रवेश सोहळ्याप्रसंगी राष्ट्रवादीच्या नेत्या रुपाली चाकणकर, आमदार ज्ञानराज चौघुले, आमदार विक्रम काळे यांची उपस्थिती होती.परभणीची जागा राष्ट्रीय समाज पक्षाला सोडल्यानंतर अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला धाराशिव लोकसभेची जागा शिवसेना-भाजपकडून देण्यात आली होती. दरम्यान, भाजप आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील 'घड्याळ' चिन्हावरुन मैदानात उतरणार असल्याचे आज अगदी स्पष्ट झाले. अर्चना पाटलांचा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अधिकृत पक्षप्रवेश झाला असून सुनील तटकरेंनी त्यांची उमेदवारी देखील जाहीर केली आहे.

दरम्यान, धाराशिवमधून शिवसेना उद्धव ठाकरे यांच्याकडून विद्यमान खासदार ओमराजे निंबाळकर यांना पुन्हा उमेदवारी जाहीर करण्यात आलेली आहे. त्यामुळे ओमराजे निंबाळकर विरुद्ध अर्चना पाटील अशी थेट लढत होणार आहे.अर्चना पाटील यापूर्वी धाराशिव जिल्हा परिषदेच्या उपसभापती होत्या, मात्र सध्या त्या कोणतेही पद सांभाळत नाहीत. लोकसभेच्या माध्यमातून त्या पुन्हा निवडणुकीच्या आखाड्यात उतरल्या आहेत.दरम्यान, अर्चना पाटील या सामाजिक कामात देखील अग्रेसर असतात. लेडीज क्लबच्या माध्यमातून बचत गटातील महिलांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. पुण्यातील भीमथडी किंवा मुंबईतील महालक्ष्मी सारख्या मोठ्या महोत्सवांसारखाच प्लॅटफॉर्म धाराशिव जिल्ह्यातील महिलांना मिळावा म्हणुन हिरकणी महोत्सवासारखी



संकल्पना जिल्ह्यात आणली.गेल्या अनेक वर्षांपासून जिल्ह्यातील बचत गटातील महिला उद्योजक या महोत्सवात दरवर्षी सहभागी होतात आणि लाखोंची उलाढाल करतात. तसेच तेरणा ट्रस्टच्या माध्यमातून हजारो नागरिकांचे मोफत रोगनिदान, शेकडो नागरिकांच्या मोफत शस्त्रक्रिया, आरोग्य शिबिरांमध्ये मोफत साहित्य वाटप यासारखे उपक्रम त्या राबवत असतात.राणा जगजितसिंह यांनी २०१९ ची लोकसभा निवडणूक राष्ट्रवादीच्या तिकिटावर लढवली होती. शिवसेनेच्या (आता ठाकरे गट) ओमराजे निंबाळकर यांच्याविरोधात राणा मैदानात उतरले होते. मात्र ओमराजेंनी त्यांना पराभवाची धूळ चारली होती.२०१९ च्या विधानसभा निवडणुकांपूर्वी राणा जगजितसिंह यांनी अमित शहा यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर ते तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवून विजयी झाले. याआधी २००४ ते २००८ आणि २००८ ते २०१४ या काळात दोन वेळा महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य राहिले आहेत.उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेने ओमराजे निंबाळकर यांना पुन्हा तिकीट दिले आहे. आता राणांची पत्नी त्याच मतदारसंघातून ओमराजेंविरोधातच मैदानात उतरली, तर पतीच्या पराभवाचा वचपा काढण्याची संधी त्यांना असेल. राणा जगजितसिंह आणि निंबाळकर यांच्यात कौटुंबिक वैर आहे, निंबाळकरांच्या वडिलांचा राणा जगजितसिंह यांच्या वडिलांनी खून केल्याचा आरोप आहे.

# पंकजाताई मुंडे यांनी घेतली केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची भेट

## बीड येथे प्रचारासाठी येणार असल्याचे आठवलेंनी केले मान्य

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

मुंबई (वृत्तसंस्था)

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले यांची काल भाजपा राष्ट्रीय सचिव तथा बीड लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या लोकप्रिय उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी सदिच्छा भेट घेऊन निवडणुकीसाठी आशीर्वाद घेतले.

पंकजाताई मुंडे यांनी मंगळवारी ना. रामदास आठवले यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली व निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चर्चा केली. यावेळी आठवले परिवाराच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. पंकजाताईंच्या प्रचारासाठी आपण आवर्जून बीड येथे सभा घेणार असल्याचे आठवले यांनी सांगितले.भेटीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या, आठवले व मुंडे साहेब यांच्यात अतिशय चांगली मैत्री होती .आमच्या नेहमीच भेटीगाठी व संवाद होतो. मात्र लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मी मुद्दाम त्यांना भेटायला आले. या निवडणुकीसाठी त्यांचे आशीर्वाद घेतले. माझ्या प्रचारासाठी आवर्जून येणार आहेत.



# धर्माबाद मध्ये मिरचीला तब्बल सात हजार ते अठरा हजार रुपये प्रतिक्विंटल भाव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

धर्माबाद । साहेबराव दुगाने

मयेथील मार्केट यार्डात मिरचीची आवक चालू झाली असून गतवर्षापेक्षा ती मंदावली असल्याचे मार्केट यार्डात बोलल्या जात आहे.

काल झालेल्या मिरचीच्या बीट मध्ये प्रति प्रमाणे तब्बल सात हजार ते अठरा हजार तीनशे रुपये प्रतिक्विंटल मिरचीला भाव मिळाला आहे.


दिनांक ०१-०४-२०२४ रोजी धर्माबाद मार्केट यार्डात ७३० पोते मिरचीची आवक झाली होती. तर भाव मिरचीच्या वेगवेगळ्या जाती प्रजाती व प्रति प्रमाणे सात हजार ते तब्बल १८



हजार ३०० रुपये क्विंटलवर गेला.

गतवर्षीच्या तुलनेत मात्र धर्माबाद मार्केट यार्डात मिरचीची आवक कमालीची घटत असल्याचे धक्कादायक चित्र दिसत असून मिरचीच्या लागवडीकडे धर्माबाद तालुक्यातील शेतकऱ्यांनी सपशेल दुर्लक्ष केले असून तेलंगाना व आंध्र प्रदेशच्या सीमा वरती गावातूनच धर्माबाद मध्ये मिरचीची आवक होत असल्याचे स्पष्ट दिसत आहेत.ठिकाणी उमेदवार जाहीर केलेत. शिवसेनेचे सर्व उमेदवार जाहीर झालेत, असेही आदित्य ठाकरे यावेळी बोलताना म्हणाले.उल्लेखनीय बाब म्हणजे शिवसेनेने यवतमाळ – वाशिम लोकसभा मतदार संघात ५ वेळा निवडून आलेल्या खासदार भावना गवळी यांचा पत्ता कट केला आहे. भाजपने त्यांच्या उमेदवारीला विरोध केल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा निर्णय घेतला आहे. गवळी यांनी शेवटच्या मिनिटांपर्यंत तिकीट मिळवण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना यश आले नाही. अखेर या मतदार संघातून हिंगोलीचे खासदार हेमंत पाटील यांच्या पत्नी राजश्री पाटील यांना उमेदवारी देण्यात आली. राजश्री पाटलांनी गुरुवारी शिंदेंच्या उपस्थितीत आपली उमेदवारी भरली.

# माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांचे सह इंदापूर तालुक्याचे पालकत्व स्विकारले आहे-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

दि.(०५) रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे इंदापूर येथे कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते.नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवण्यासाठी आणि त्यांचे महाराष्ट्रातून लोकसभेच्या माध्यमातून हात बळकट करण्यासाठी मी आज इंदापूर येथे आलो आहे.

आपण विधानसभेची काही काळजी करू नका मी इंदापूर सह हर्षवर्धन पाटील यांचेही पालकत्व स्वीकारत आहे,असे ते जाहीर सभेत म्हणाले.

अंकिता पाटील/ठाकरे यांनी इंदापूर तालुक्यातील विकास कामांचा आढावा घेतला.आणि म्हणाल्या की आमच्या कार्यकर्त्यांना राष्ट्रवादीच्या नेत्यांकडून भरपूर त्रास दिला जात आहे.भाजपच्या कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल केले जात आहेत.आम्हाला मागील चार विधानसभेला फसवले आहे.म्हणून भाजपच्या सर्वसामांन्य कार्यकर्त्यांमध्ये चिड निर्माण झाली आहे.आम्ही लोकसभेला प्रामाणिकपणे काम करतो परंतु आम्हाला विधानसभेला दगा फटका होणार नाही याची काळजी आपण स्वतः घ्यावी अशी विनंती उपमुख्यमंत्री यांना अंकिता पाटील ठाकरे यांनी केली.

हर्षवर्धन पाटील म्हणाले की आम्हाला प्रत्येक विधानसभेला फसवलेले आहे.त्यामूळे कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. कार्यकर्त्यांची लोकसभेला घड्याळाला मतदान करण्याची इच्छा नाही परंतु फडणवीस साहेब जे आदेश देतील तोआम्हाला मान्य आहे.

माजी सभापती प्रविण माने यांनी प्रचारातुन मध्येच माघार घेतली.अशी सभेच्या ठिकाणी जोरदार चर्चा चालू होती.कारण हेलीपॅडच्या ठिकाणी प्रविण माने आले आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना घेऊन थेट घरी गेले.त्यामुळे प्रविण माने भाजपा मध्ये जाणार अशी जोरात चर्चा सभास्थळी चालू झालेली पाहावयास मिळाली.

माने यांनी देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत केले आणि घरी चहासाठी येण्याची विनंती केली, लागलीच फडणवीस हे माने यांच्या निवासस्थानी पोहचले. यानंतर पत्रकारांशी बोलताना फडणवीस म्हणाले माने यांच्याशी माझे घरगुती संबंध आहेत,यावर माने यांनी सांगितले की, तुम्ही नेहमी येत असता, मात्र माझ्या घरी आलेच नाहीत, आता चहाला यावे.तेव्हा चहासाठी येण्याची विनंती केली, त्यामुळे मी तेथे गेलो, अर्थात माने हे जुने सहकारी आहेत आणि तसे ते आमचेच आहेत,असे सांगत यातील ट्विस्ट आणखीणच वाढवला.यामुळे येणाऱ्या काळात पुणे जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रविण माने यांच्या राजकीय भूमीकडे इंदापूर तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे. यावेळी दौंड चे आमदार राहुल कुल,पृथ्वीराज जाचक,वासुदेव काळे,अंकिता पाटील /ठाकरे, संपतराव बंडगर,राजवर्धन पाटील, पराग जाधव,ईत्यादी प्रमुख मान्यवरांसह मोठ्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता.

# डॉ.प्रशांत जाधव डीएनबी मेडिसिन परीक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**



पाटोदा येथील भामेश्वर विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक एल.आर.जाधव यांचे चिरंजीव डॉ.प्रशांत जाधव यांनी फेब्रुवारी मध्ये हरीयाना राज्यातील फरीदाबाद येथे झालेल्या डीएनबी मेडिसिन परीक्षेत विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण होते पदवी प्राप्त केली. डॉ.प्रशांत जाधव यांनी नुकतेच काही दिवसांपूर्वीच एम.डी. रिस्पाइरेटरी मेडिसिन परीक्षेमध्ये विद्यापीठातुन प्रथम क्रमांकाने उतीर्ण होऊन नेत्र दिपक यश मिळविले होते. अशा प्रकारे त्यांनी मेडिकल क्षेत्रातील दुहेरी यश प्राप्त केले आहे. एम.डी.पाठोपाठच डीएनबी परीक्षेत नेत्र दिपक यश मिळाल्याने वैद्यकीय क्षेत्रात काम करतांना 'रूग्ण सेवा हीच ईश्वर सेवा' गृहीत धरून कायम सेवा करीत राहील असा विश्वास त्यांनी भ्रमणध्वनी द्वारे प्रतिनिधीशी बोलताना दिला आहे. डॉ.प्रशांत जाधव यांच्या यशाने पाटोद्याच्या वैद्यकीय क्षेत्राच्या वैभवात भर टाकली आहे. त्यांच्या यशाने पाटोदा शहरातील वैद्यकीय व इतर शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना प्रेरणा व नवीन उर्जा मिळेल. डॉ.प्रशांत जाधव यांनी कोरोना च्या काळात गंभीर रूगणांना योग्य उपचार व मार्गदर्शन केल्या मुळे अनेक रूग्ण घरीच बरे झालेले आहेत. त्या रुग्णाला इतर कोणत्याही हॉस्पिटल मध्ये जाण्याची गरज भासली नाही. भविष्यातही डॉ.प्रशांत जाधव हे पाटोदा शहराचे नाव सुवर्ण अक्षराने कोरतील असा अनेकांना विश्वास आहे. डॉ.प्रशांत जाधव यांचे या यशाबद्दल ह.भ.प.रामकृष्ण रंधवे(बापु)महाराज, ह.भ.प.राधाताई महाराज(आईसाहेब), ह.भ.प.सतिष महाराज उरणकर, ह.भ.प.नानासाहेब कदम महाराज, आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्वीय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमिनाथ कोल्हे, पाटोदा नगर पंचायतचे नगराध्यक्ष राजुभैय्या जाधव, गटनेते बळीराम पोटे, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक पठाण नय्युम भाई, माजी सभापती तथा नगरसेवक श्रीहरी गिते पाटील यांच्या सह अनेकांनी अभिनंदन करून पुढील कार्यास व वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## सुधाकर पाटील पवार यांची वाढदिवस न करता

# मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या बेरळी येथील सुमित ढेंबरे यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**



दि. ५ एप्रिल रोजी सामाजिक कार्यात सतत अग्रेसर असणारे लोहा येथील युवा समाजसेवक सुधाकर पाटील पवार यांचा वाढदिवस! त्यानिमित्त त्यांनी हार तुरे न स्विकारता शुभेच्छा बॅनर पोस्टर यांच्यावर वायफळ खर्च न करता त्यांनी मराठा आरक्षणासाठी अगदी १६ वर्ष वय असलेल्या सुमितने आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपविली म्हणून आज दि.५ एप्रिल रोजी सुधाकर पाटील पवार हे कै.सुमित यांच्या बेरळी येथील घरी स्वतः जाऊन .सुमीतचे वडील शरद दादाराव ढेंबरे यांची बेरळी ता. लोहा यांचे सात्वन करुन त्यांना सुधाकर पाटील पवार यांच्या कडून ११ हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली.

यावेळी बोलताना युवा समाजसेवक सुधाकर पाटील पवार म्हणाले की,मराठा समाजातील सर्व मित्र बांधवांना विनंती आहे की असे टोकाचे पाऊल उचलू नका आपल्या परिवाराचा विचार करा. तुम्ही जिवंत राहून शिक्षण घेतलात तर आरक्षणाचा फायदा आहे नाहीतर काय फायदा त्या आरक्षणाचा तुम्ही नसल्यास. तेव्हा मराठा समाजातील युवकांना मी हात जोडून कळकळीची अशी विनंती करतो की, मराठा आरक्षणासाठी कुणीही आत्महत्या करु नये .आपल्याला ही लढाई जिंकायची आहे. मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केलेल्या बेरळी येथील सुमितच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत करण्यासाठी पुढे यावे.

असे सुधाकर पाटील पवार म्हणाले. यावेळी माऊली पाटील पवार, नागेश पाटील हिलाल, ऋषिकेश जोगदंड, निळू वडजे ,पवन लोंढे भानू पवार आदी उपस्थित होते.

# निवडणूक निरीक्षक श्रीमती एम.एस.अर्चना यांच्याकडून दूरस्थ मतदान केंद्रांची पाहणी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हिंगोली । सय्यद रहीम रजा**

हिंगोली लोकसभा मतदारसंघात आदर्श आचासंहिता लागू झाली असून, निवडणूक निरीक्षक (सामान्य) श्रीमती एम. एस. अर्चना यांनी आज जिल्ह्यातील दूरस्थ मतदान केंद्रांना भेटी देत पाहणी केली.

यावेळी संपर्क अधिकारी सुनील शिंदे, श्रीमती पुष्पा पवार व नायब तहसीलदार श्री. गायकवाड उपस्थित होते. हिवरखेडा, बोरखेडी, लिंबाला व भंडारी या दूरस्थ मतदान केंद्रास भेटी देऊन तेथील मूलभूत सुविधाची पाहणी केली. मतदान केंद्रावर स्वच्छतेसह इतर सर्व आवश्यक सुविधेसोबतच उन्हापासून बचावासाठी शेड व पिण्याचे पाणी या दोन सुविधा प्रामुख्याने उपलब्ध ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी उपस्थित अधिकारी श्री. गायकवाड यांनी निवडणूक निरीक्षक (सामान्य) श्रीमती एम. एस. अर्चना यांना जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात येत असलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. तसेच तलाठी, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपास्थित होते. तसेच त्यांनी गावातील मतदारांशी संवाद साधला.

मतदानावेळी मतदारांना किमान आवश्यक सुविधा पुरविणे आवश्यक आहे. सर्व संबंधितांनी मूलभूत सुविधांच्या उपलब्धतेची खात्री केली. या दूरस्थ मतदान केंद्रांवरील किमान आवश्यक सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने त्यांनी पाहणी केली. मतदान केंद्रांवर आवश्यकतेनुसार डागडुजी, दुरुस्ती, सर्व मतदान केंद्रांवर प्रकाश, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, रॅम्प आदींच्या व्यवस्थेची पाहणी केली.

ज्या मतदान केंद्रांवर दिव्यांग मतदार मतदान करतील तेथे व्हीलचेअर व स्वयं सेवकांची व्यवस्थेचीही तपासणी केली. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे मतदान केंद्रांवर पिण्याच्या पाण्याच्या पुरेशा उपलब्धतेची दक्षता घेऊन आयोगाच्या सूचनांनुसार आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी केल्या. मतदान केंद्रावर पोहोचण्यास मतदाराना त्रास होणार नाही, याची दक्षता सर्वांनी घ्यावी. मतदानाची तारीख लक्षात घेता सावलीची व्यवस्था तसेच रांगेचे नियोजन करावे. सर्व मतदार केंद्रावर प्रथमोपचार सुविधा देताना आवश्यक औषधे मतदान केंद्रावर उपलब्ध ठेवण्यात यावीत, असे निर्देश निवडणूक निरीक्षक श्रीमती अर्चना यांनी दिले.

# अंकुश तिडके यांचा वाढदिवस नृसिंह निवासी अस्थिव्यंग अपंग विद्यालय व अपूर्वा मतिमंद विद्यालय येथे साजरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

सेनगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक अंकुश तिडके यांचा वाढदिवस नृसिंह निवासी अस्थिव्यंग अपंग विद्यालय व अपूर्वा निवासी मतिमंद विद्यालय येथे साजरा करून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आला होता यावेळी अंकुश तिडके यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या या शालेय शिक्षक विद्यार्थी नगरसेवक गोविंदराव कोकाटे सर ,नगरसेवक तथा भाजपा गटनेते अमोल तिडके ,भैय्या जाधव ,बाळू लांडगे ,अमर तिडके, भागवत तिडके, सचिन वानरे, राजू देशमुख ,पत्रकार महादेव हरण ,मनोज हजारे, विलास सुतार, बालाजी हरण ,करण हरण ,प्रकाश हरण, सुनील विटकर, व आदींची उपस्थिती होती,

# बीडची जनता सुज्ञ,विचार करणार : माझी तयारी ५ वर्षांपासून सुरू-पंकजा मुंडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड। प्रतिनिधी**

बीडची जनता फार सुज्ञ आहे ती विचार करून निर्णय घेणार अशी प्रतिक्रिया बीडमध्ये भाजपच्या उमेदवार पंकजा मुंडे यांनी दिली आहे. बीडमध्ये महाविकास आघाडीने शरद पवार गटाकडून बजरंग सोनवणे यांना बीडमध्ये उमेदवारी जाहीर केली आहे. यावर पंकजा मुंडे यांनी भाष्य केले आहे. पंकजा मुंडे यांनी यावेळी बजरंग सोनवणे यांना शुभेच्छा देखील दिल्या आहेत. ''सोनवणे यांना तिकीट जाहीर झाले असेल, तर त्यांना निवडणुकीसाठी शुभेच्छा आहे. माझी निवडणुकीची तयारी ही नुसती निवडणूक जाहीर झाल्यावर सुरू होत नाही तर पाचही वर्ष चालू असते. संपर्क, कामे, समाजाची कामे हे सर्व पाच वर्षे चालू असते. त्यामुळे निवडणुकीमुळे माझ्या रुटीनमध्ये फरक पडणार नाही'', असे त्या म्हणाल्या.तसेच ''प्रीतम ताई सुद्धा मतदारसंघात दौरे करत होत्या. आता आमचे मित्र पक्ष देखील काम करत आहेत. उमेदवारी जाहीर झाल्याचे हे निमित्त आहे. कोणत्याही उमेदवाराला आपला विजय होणार असे वाटणं आवश्यक असते. मात्र तुम्ही पाच वर्षे लोकांसाठी काय करता, मतदारांशी भेटता की नाही या गोष्टी सुद्धा महत्त्वाच्या असतात. बीडची जनता फार सुज्ञ आहे आणि ती नक्कीच विचार करेल'', असेही पंकजा मुंडे म्हणाल्या.

# एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्याच्या निर्णयाचा विरोध

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

पैठणच्या नाथसागरातील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवण्यात आले असतांनाही आणी या पाण्याचे योग्य तसे नियोजन करता येत असतांनाही याकडे पैठण नगर परिषदेच्या प्रशासकांनी व पाणीपुरवठा विभागाने साफ दुर्लक्ष करून पैठण शहराला एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचा जो निर्णय घेतला आहे, त्यामुळे पैठणकर चांगलेच संतापले आहेत. या बाबीची विभागीय आयुक्त तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी एक पथक नियुक्त करून सखोल चौकशी करावी, अशी मागणी पैठण येथील नागरिकांनी केली आहे.



दिव्यांग संघर्ष समितीचे अध्यक्ष शेख जिलानी यांचा वाढदिवसा निमित्त सत्कार करुन शुभेच्छा देताना. पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमिनाथ कोल्हे, पत्रकार शेख अजिज, पत्रकार गणेश शेवाळे, प्रेस फोटोग्राफर जितेंद्र भोसले, पत्रकार शेख महेशर, मंगेश नेमाने, अम्मु शेख सह इतर.(छाया-लोकनेता न्युज नेटवर्क पाटोदा.)

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904